पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 06/02/2020 (गुरूवार)
(दुपार)

---

## दुखापत

पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत 16 कि. मी. अंतरावर मौजा हिवरामठ शिवार येथे दिनांक 05/02/2020 चे 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— ज्ञानेश्वर बकाराम नेहारे, वय 54 वर्ष, रा. हिवरमठ ता. नरखेड यांच्या पराटीच्या शेतात आरोपी नामे— हरीचंद्र नागो नेहारे, वय 38 वर्ष, रा. हिवरमठ यांचे 6 जनावरे शेतात गेले होते. दरम्यान फिर्यादीने आरोपीला म्हटले की, ''कापूस वेचू दे, नंतर ढोरे वासरे शेतात चार'' असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीचे तोंडावर हातबुक्कीने मारहाण करून समोरचे वरचे दोन दात पाडले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 325 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अनिल जोशी 7499760728 हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर एसबीआय एटीएम कळमेश्वर येथे दिनांक 24/01/2020 चे 15.44 वा. ते दिनांक 01/02/2020 चे 24.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— महेन्द्र हारू चार, वय 40 वर्ष, रा. बेदाया, ता. पालाजांरी, जि. देवगर झारखंड, ह. मु. दिलीप बिल्डकॉम लि कंपनी सेलु हे एसबीआय एटीएम कळमेश्वर येथे पैसे ट्रान्सफर करण्याकरीता गेले होते. दरम्यान एटीएम मध्ये पुर्वीपासुनच हजर असलेल्या अज्ञात आरोपीने पैसे ट्रान्सफर करण्यासाठी मदत करण्याच्या बहाण्याने फिर्यादीचे एटीएमची हातचलाकिने व नजर चुकवुन अदलाबदल करून दुसरे एटीएम दिले. यानंतर आरोपीने फिर्यादीचे बॅक खत्यातुन एटीएमद्वारे एकुण 41,300/—रू. वेळोवेळी काढुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार नारनवरे 9764064385 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर